महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे | Rs.2/- | कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

मंगळवार ■ २४ जून २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक ००३ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

## महापालिका निवडणुकांचा बार ऑक्टोबर नंतरच !

### प्रभाग रचनेचे वेळापत्रक जाहीर ■ ऑक्टोबरची डेडलाईन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

आगामी महानगरपालिका निवडणुकीच्या प्रभागरचना ऑक्टोबर महिन्यात अंतिम होणार आहे. प्रभागरचना प्रक्रियेचे वेळापत्रक जाहीर झाले आहे. महापालिका, नगरपालिका निवडणुका ऑक्टोबर महिन्यानंतरच होणार आहेत. महापालिका नगरपालिकांच्या प्रभाग रचना अंतिम करण्यासाठी चार महिन्यांचा कालावधी लागणार आहे. मुंबई महापालिका प्रभाग रचना 6 ऑक्टोबरनंतर अंतिम होणार आहे. तर ड वर्ग महापालिका प्रभाग रचना 13 ऑक्टोबरला अंतिम होणार आहे.

**असे असणार महत्त्वाचे टप्पे**

- प्रारुप प्रभाग रचना तयार करणे
- यामध्ये जनगणनेची माहिती तपासणे, स्थळ पाहणी, गुगल मॅप वर प्रभागाचे नकाशे तयार करणे, प्रारुप प्रभाग रचनेचा मसुदा तयार करून त्यावर समितीने स्वाक्षऱ्या करणे. 17 जून ते 31 जुलै दरम्यान हे काम पूर्ण केले जाणार आहे.
- प्रारुप प्रभाग रचनेचा प्रस्ताव नगरविकास विभागास सादर करणे - 1 ऑगस्ट ते 5 ऑगस्ट
- प्रारुप प्रभाग रचनेचा प्रस्ताव नगर विकास विभागाने राज्य निवडणूक आयोगाला सादर करणे - 6 ऑगस्ट ते 11 ऑगस्ट
- राज्य निवडणूक आयोगाने प्रारूप प्रभाग रचनेस मान्यता देणे
- प्रारुप प्रभाग रचना प्रसिद्ध करणे व त्यावर हरकती मागवणे - 22 ऑगस्ट ते 28 ऑगस्ट
- प्राप्त हरकती आणि सूचनांवर सुनावणी घेणे - 29 ऑगस्ट ते 8 सप्टेंबर
- सुनावणीनंतर हरकती आणि सूचनांवर शिफारशी विचारात घेऊन प्राधिकृत अधिकाऱ्यांनी प्रभाग रचना अंतिम करून नगर विकास विभागाला पाठवणे
- अंतिम केलेली प्रभाग रचना नगर विकास विभागाने राज्य निवडणूक आयोगाला सादर करणे- 26 सप्टेंबर ते 22 सप्टेंबर
- राज्य निवडणूक आयोग यांनी अंतिम प्रभाग रचनेला मान्यता देणे
- राज्य निवडणूक आयुक्त यांनी अंतिम प्रभाग रचना अधिसूचनेद्वारे प्रसिद्ध करणे - 3 ऑक्टोबर ते 6 ऑक्टोबर
- राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका चार टप्प्यांमध्ये होणार आहेत. ऑक्टोंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासूनच मतदानाला सुरुवात होणार आहे. बाबत आता निवडणूक आयोग तयारी करत आहे.

राज्यातील महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदा, पंचायत समिती, आदींच्या निवडणुका कधी कोरोनाच्या संसर्गाचे कारण देत, तर कधी ओबीसी आरक्षणाचा मुद्दा समोर आणून घेतल्या गेल्या नाहीत. ओबीसी आरक्षण द्यायचे की नाही यावरसुद्धा बराच गदारोळ झाला. कोरोनाचा संसर्ग कमी झाल्यानंतर 2020 पासून राज्यात कुठे एकदा तर कुठे दोनदा, तीनदा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची तयारी करण्यात आली होती. पण, या निवडणुका घेण्यात आलेल्या नाहीत.

**थोडक्यात महत्वाचे**

## विद्यार्थ्यांच्या सहयोगातून दोन लाख सीडबॉलची निर्मिती



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** - रोटरी क्लब ऑफ डोंबिवली ईस्टच्या वतीने वड, पिंपळ यांसारख्या विविध झाडांच्या बिया वापरून मातीचे गोळे करण्यात आले. यामध्ये दोन हजार ३०० विद्यार्थी, ३०० सामाजिक संस्थांचे कार्यकर्ते, १०० रोटेरियन यांनी मिळून दोन लाख पाच हजार ८० सीडबॉलची निर्मिती केली.

ओमकार शाळेसह शहरातील विविध शाळांमधील हजारो विद्यार्थ्यांनी मिळून हे बॉल तयार केले. संत सावळाराम क्रीडा संकुलातील बंदिस्त क्रीडांगणमध्ये हा उपक्रम संपन्न झाला. निर्मिती केलेले लाखो सीडबॉल हे शहरातील विविध रिकाम्या जागेत, घाटात तसेच टेकड्यांवर पेरण्यात येतील. यावेळी कार्यक्रमावेळी भाजपचे प्रदेश कार्यध्यक्ष रवींद्र चव्हाण, आमदार राजेश मोरे, महापालिका आयुक्त अभिनव गोयल, रोटरीचे जिल्हाध्यक्ष दिनेश मेहता, अध्यक्ष माधव सिंग, सचिव चक्रपाणी शुक्ल, फर्स्ट लेडी उमा सिंग, प्रकल्प प्रमुख डॉ. महेश पाटील हे उपस्थित होते.

## दिवा-साबे खारफुटी भराव प्रकरण - सहा जणांवर गुन्हे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली** - मध्य रेल्वेच्या दिवा ते मुंब्रा रेल्वे स्थानकांच्या दरम्यान दिवा, साबे पूर्व भागातील कांदळवनावरील (खारफुटी) कचरा आणि माती भरावप्रकरणी ठाणे महसूल विभागाने मागील पाच वर्षाच्या कालावधीत एकूण सहा जणांवर गुन्हे दाखल केले आहेत. हरितक्षेत्रात बांधकामे करणाऱ्या भूमाफियांची ३१ बेकायदा बांधकामे जमीनदोस्त करण्यात आली आहेत, अशी माहिती ठाणे महसूल विभागाचे तहसीलदार उमेश पाटील यांनी दिली आहे.



## ठाणे परिवहन सेवेत दाखल होणार २५ नव्या इलेक्ट्रिक बस

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : ठाणेकरांचा टीएमटीचा प्रवास सुखद आणि गारेगार होणार आहे. लवकरच ठाणे परिवहन सेवेच्या ताफ्यात १५ ऑगस्टच्या दिवशी २५ नवीन इलेक्ट्रिक बस दाखल होणार आहेत. पंतप्रधान इलेक्ट्रिक बस योजनेच्या माध्यमातून १०० बस परिवहन सेवेत समाविष्ट होणार आहेत. त्यातील पहिल्या टप्प्यात २५ बस दाखल होतील. या सर्व बस वातानुकूलित असणार आहेत. तर उर्वरित बस टप्प्याटप्प्याने परिवहन सेवेत दाखल होणार आहेत. इलेक्ट्रिक बस या पर्यावरणपूरक आहेत. विशेष म्हणजे डिझेलच्या तुलनेत यांचा खर्च कमी येतो. इलेक्ट्रिक बस पायी प्रति किमी साधारण २५ रुपयांची बचत होते आहे. एक इलेक्ट्रिक बस दिवसाला सुमारे १०० ते १२० किमी अंतर धावते. याचा विचार केल्यास एका इलेक्ट्रिक बस मागे दिवसाला साधारण अडीच हजार तर महिन्याला ७५ हजार रुपयांची बचत होते. त्यानुसार पंतप्रधान इलेक्ट्रिक बस योजनेच्या माध्यमातून १०० नवीन गाड्या ठाणे परिवहन सेवेला मिळणार आहेत. यासर्व इलेक्ट्रिक बस वातानुकूलित असणार आहेत. यात नऊ मीटरच्या ६० आणि १२ मीटरच्या ४० बसचा समावेश असणार आहे. या बस यापूर्वी मार्च अखेरीपर्यंत ठाणे परिवहन सेवेत दाखल होणार होत्या. मात्र त्याला विलंब झाला आहे. परंतु आता येत्या १५ ऑगस्टला ठाणे परिवहन सेवेच्या ताफ्यात दाखल होणार आहे.

## आगामी निवडणूकीत भाजपा एक नंबर पक्ष असला पाहिजे - मंत्री जयकुमार गोरे



येणाऱ्या निवडणुका या कार्यकर्त्यांच्या आहेत.त्यासाठी ग्रामविकास मंत्री यांनी घेतलेल्या निर्णयामुळे पक्षाच्या कार्यकर्त्यांना बळ मिळणार आहे असे मत आमदार किसन कथोरे यांनी केले यावेळी व्यक्त केले.

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी ( प्रतिनिधी )** ठाणे जिल्ह्यात भाजपा हा एक नंबरचा पक्ष आहे हे विरोधक व आपले मित्रपक्ष सुद्धा मान्य करतात.त्यामुळे महायुती म्हणून निवडणुका लढलो तरी त्यामध्ये मोठा वाटा हा भाजपाचा असला पाहिजे असे परखड मत राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी भिवंडीत झालेल्या कार्यक्रमात व्यक्त केले आहे. भिवंडी तालुक्यातील अंजूर गांव परिसरातील एका रिसॉर्ट सभागृहात भारतीय जनता पार्टी ठाणे जिल्हा ग्रामीणवतीने आयोजित कार्यकर्ता संवाद बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी आमदार किसान कथोरे,विधान परिषद सदस्य आमदार निरंजन डावखरे,आ.ज्ञानेश्वर म्हात्रे,माजी आमदार पांडुरंग बरोरा,जिल्हाध्यक्ष जितेंद्र डाकी, रामभाऊ पातकर,युवा नेते देवेश पाटील, महिला जिल्हाध्यक्षा शीतल तोंडलीकर,सरचिटणीस संभाजी शिंदे व्यासपीठावर उपस्थित होते.तसेच जिल्ह्यातील सर्व मंडळ अध्यक्षांसह प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

प्रधानमंत्रीं नरेंद्र मोदी यांनी सर्वसामान्यांसाठी राबविलेल्या बहुतांश योजना ग्रामविकास मंत्रालय राबवित आहे.राज्यात यावर्षी दिलेल्या घरकुल योजनांचा लाभ जिल्ह्यात हजारो कुटुंबियांना मिळणार आहे.तसेच लखपती दीदी योजनेचा लाभ अनेक बचतगटांना मिळत आहे.शासनाच्या लोकपयोगी योजना शहर व ग्रामीण जनतेपर्यत पोहचविण्याचे काम कार्यकर्त्यांनी करावे असे आवाहन त्यांनी केले. ग्रामीण भागातील विकासाचा मुद्दा व तेथील अडचणी पक्षाच्या माध्यमातून सोडवल्या तर पक्षाला यश मिळेल.त्यासाठी प्रत्येकाने जबाबदारी स्वीकारून कार्यकर्त्यांनी झोकून देऊन काम केल्यास यश नक्की मिळेल असा विश्वास मंत्री जयकुमार गोरे यांनी यावेळी व्यक्त केला.

येणाऱ्या निवडणुका या कार्यकर्त्यांच्या आहेत.त्यासाठी ग्रामविकास मंत्री यांनी घेतलेल्या निर्णयामुळे पक्षाच्या कार्यकर्त्यांना बळ मिळणार आहे असे मत आमदार किसन कथोरे यांनी केले यावेळी व्यक्त केले.



## मरणानंतरही स्मशान यातना !

### शहापूर तालुक्यातील तीनशे गाव-पाड्यांमध्ये स्मशानभूमी अभावी मृतदेहांची हेळसांड

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर** : आदिवासी नागरिकांचे प्रमाण जास्त असणाऱ्या शहापूर तालुक्यात सुमारे ३२७ गाव-पाड्यांमध्ये स्मशानभूमीच नसल्याची बाब उघडकीस आली आहे. स्मशानभूमी अभावी मरणानंतरही मृतदेहाची हेळसांड होत असून पावसाळ्यात मृतदेहाचे दहन करण्याचा प्रश्न गंभीर होत आहे.

ठाणे जिल्ह्याचा शहापूर तालुक्यात प्रामुख्याने आदिवासी नागरिक वास्तव्यास आहेत. यामध्ये ११० ग्रामपंचायतींमध्ये २२७ गावे आणि ५१४ पाडे येतात. तालुक्यात तानसा, दापूर, कसारा (खु), भुईशेत, भोयेपाडा, गरेलपाडा, सावरदेव, पेंढरी, बोराळा, वारलीपाडा, भेकरमाळ, सावरखुट, उठावा, दापूरमाळ अशा ३२७ गावपाड्यांवर स्मशानभूमी नसल्याचे उघडकीस आले आहे. येथील ग्रामस्थांना पावसाळ्यात अंत्यसंस्कार करण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागत असल्याचे चित्र आहे. गावपाड्यांमधील अंतर्गत वाद या मुख्य कारणामुळे बहुतांशी ठिकाणी स्मशानभूमीची कामे मंजूर होऊन देखील ती रखडलेली आहेत.

तर, स्मशानभूमीचे पत्रे उडणे, स्मशानभूमी जमीनदोस्त होणे, स्मशानभूमीसाठी वनखात्याच्या जागेची अडचण, खाजगी जागेची अडचण, तर काही ठिकाणी रस्ता नसणे यामुळे स्मशानभूमी निर्मितीत अडचणी निर्माण होत आहेत. आदिवासी अतिदुर्गम भागात दरवर्षी लाखो रुपयांचा निधी खर्च केला जातो. मात्र, तालुक्यातील नागरिकांना स्मशानभूमीसाठी प्रतिक्षा करावी लागत असल्याचे दिसून येत आहे. अनेक गावात स्मशानभूमीपर्यंत रस्ता नसल्याने पावसाळ्यात चिखलातून वाट काढावी लागते आहे. तर, काही ठिकाणी नदीतून मृतदेह न्यावे लागत आहेत. तर, उर्वरित स्मशानभूमीत छत नसल्याने उघड्यावरच अंत्यसंस्कार करावे लागत असल्याचे उघडकीस येत आहे. पावसामुळे मृतदेहाची हेळसांड होत असून शहापूर तालुक्यात हा प्रश्न गंभीर होत आहे. शहापूर तालुक्यात ११० ग्रामपंचायतींमध्ये २२७ गावे आणि ५१४ पाडे येतात. तालुक्यात आरसीसी बांधकाम असलेल्या १९७ स्मशानभूमी आहेत. तसेच, २३१ स्मशानभूमी सुस्थितीत आहेत. तर, ३२६ ठिकाणी पक्क्या स्वरूपाच्या स्मशानभूमी नसून २२९ ठिकाणी स्मशानभूमींची पडझड झाली आहे. तसेच जमीन उपलब्ध नसल्याने देखील २२९ ठिकाणी स्मशानभूमी रखडल्या आहेत. याशिवाय बहुतांशी ठिकाणी रस्ते, वीज आणि पाण्याची सुविधा नसल्याने अंत्यसंस्कारासाठी नागरिकांची गैरसोय होत आहे.

## केंद्र शासनना मार्फत ठाणे जिल्ह्यातील ७७७ गावांमध्ये स्वच्छता सर्वेक्षण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** - स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण २०२५ या उपक्रमांतर्गत ठाणे जिल्ह्यातील ७७७ गावांमध्ये केंद्र शासनामार्फत पाहणी होणार आहे. या पाहणीमध्ये घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनासाठी उभारण्यात आलेल्या सुविधांचा वापर, सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता, तसेच प्रत्येक कुटुंबांना भेटी देऊन त्यांच्या स्वच्छतेविषयीच्या मानसिकतेत झालेला बदल समजून घेतला जाणार आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी ग्रामस्थांनी लोकसहभाग आणि श्रमदानाच्या माध्यमातून सार्वजनिक सुविधा नियमित वापरून परिसर स्वच्छ व प्लास्टिकमुक्त ठेवावा, असे आवाहन केले आहे.

ठाणे जिल्ह्यात दरवर्षी स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण या उपक्रमात प्रत्येक ग्रामपंचायत सहभागी होत असते. केंद्र शासनाच्या वतीने प्रत्येक ग्रामपंचायतीची अद्यावत माहिती घेऊन उभारण्यात आलेल्या घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाच्या सुविधांची चाचणी आणि तपासणी करण्यासाठी पथक तयार करण्यात आले आहे. हे पथक प्रत्येक ग्रामपंचायतीची तपासणी आणि पाहणी केली जाणार आहे. त्यानुसार, प्रत्येक ग्रामपंचायतीची तपासणी करून १ हजार गुणांपैकी प्राप्त झालेल्या गुणांकनाच्या आधारे जिल्ह्याचे गुणांकन ठरणार आहे. जिल्ह्यांच्या गुणांकनावरुन राज्याचे गुणांकन देशपातळीवरती ठरणार आहे. त्यामुळे प्रत्येक गावाने आपापल्या सुविधांचा वापर नियमित केला पाहिजे, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी केले आहे.



जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी ग्रामस्थांनी लोकसहभाग आणि श्रमदानाच्या माध्यमातून सार्वजनिक सुविधा नियमित वापरून परिसर स्वच्छ व प्लास्टिकमुक्त ठेवावा, असे आवाहन केले आहे.









# गीतासार



### अध्याय १४
### गुणत्रयविभागयोगः

अप्रकाशोऽप्रवृत्तिश्च प्रमादो मोह एव च । तमस्येतानि जायन्ते विवृद्धे कुरुनन्दन ॥ १४-१३ ॥

हे कुरुनंदना (अर्थात कुरुवंशी अर्जुना), तमोगुण वाढल्यावर अंतःकरण व इंद्रिये यांत अंधार, कर्तव्य कर्मांत प्रवृत्ती नसणे, व्यर्थ हालचाली आणि झोप इत्यादी अंतःकरणाला मोहित करणाऱ्या वृत्ती ही सर्व उत्पन्न होतात. ॥ १४-१३ ॥

यदा सत्त्वे प्रवृद्धे तु प्रलयं याति देहभृत् । तदोत्तमविदां लोकानमलान्प्रतिपद्यते ॥ १४-१४ ॥

जेव्हा हा मनुष्य सत्त्वगुण वाढलेला असताना मरण पावतो, तेव्हा तो उत्तम कर्मे करणाऱ्यांच्या निर्मळ दिव्य स्वर्गादी लोकांत जातो. ॥ १४-१४ ॥

रजसि प्रलयं गत्वा कर्मसङ्गिषु जायते । तथा प्रलीनस्तमसि मूढयोनिषु जायते ॥ १४-१५ ॥

रजोगुण वाढलेला असता मरण पावल्यास कर्मांची आसक्ती असणाऱ्या मनुष्यांत जन्मतो. तसेच तमोगुण वाढला असता मेलेला माणूस किडा, पशू, पक्षी इत्यादी मूढ (विवेकशून्य) जातींत जन्मतो. ॥ १४-१५ ॥

कर्मणः सुकृतस्याहुः सात्त्विकं निर्मलं फलम् । रजसस्तु फलं दुःखमज्ञानं तमसः फलम् ॥ १४-१६ ॥

श्रेष्ठ (सात्त्विक) कर्माचे सात्त्विक अर्थात सुख, ज्ञान आणि वैराग्य इत्यादी निर्मळ फळ सांगितले आहे. राजस कर्माचे फळ दुःख तसेच तामस कर्माचे फळ अज्ञान सांगितले आहे. ॥ १४-१६ ॥

# गौरीपाडा येथील सिमेंट काँक्रीटच्या रस्त्याचे भुमिपूजन





दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर(नरेंद्र पाटील)**

कल्याण पश्चिम विधानसभा मतदारसंघातील प्रभाग क्रमांक 5 मधील सिमेंट काँक्रीटच्या रस्त्याचा भूमिपूजन सोहळा रविवारी अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. राज्याचे वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, माजी आमदार नरेंद्र पवार आणि युवासेना जिल्हा चिटणीस वैभव विश्वनाथ भोईर यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते.

कल्याण पश्चिमेच्या प्रभाग क्रमांक 5 गौरीपाडा येथील वृंदावन रेसिडेन्सी ते साई चौक योगीधाम पर्यंतच्या रस्त्याचे काँक्रीटीकरण करण्यात येणार आहे. यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी माजी नगरसेवक दया गायकवाड यांनी शासन स्तरावर पाठपुरावा केला आहे. त्यामुळे तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निधीतून 50 लाख आणि विद्यमान आमदार विश्वनाथ भोईर यांच्या आमदार निधीतून 1 कोटी रुपयांचा विकासनिधी यासाठी प्राप्त झाला आहे. या संयुक्त निधीच्या माध्यमातून याठिकाणी आता सिमेंट काँक्रीटच्या रस्त्याचे काम केलं जाणार आहे. या भूमिपूजन सोहळयात राज्याचे वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, माजी आमदार नरेंद्र पवार, युवासेना जिल्हा चिटणीस वैभव विश्वनाथ भोईर यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून या कामाचा शुभारंभ करण्यात आला. तर यावेळी उपस्थितांशी संवाद साधताना माजी आमदार नरेंद्र पवार यांनी स्थानिक लोकप्रतिनिधी दया गायकवाड यांच्या प्रभागातील कामाची स्तुती केली. तसेच कोविड काळामध्ये त्यांनी केलेल्या कामाचीही यावेळी विशेष आठवण करून देत कौतुकाची थाप दिली. यावेळी झालेल्या कार्यक्रमाला भाजपा 138 विधानसभा संयोजक अर्जुन म्हात्रे, भगवान म्हात्रे, श्याम मिरकुटे, नरेंद्र सिंग, पप्पू मिश्रा यांच्यासह अनेक मान्यवर आणि स्थानिक नागरिक उपस्थित होते.

# डॉ. मुरहरी केळे यांना
## मराठी विषयात पीएच.डी. पदवी प्रदान



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मराठी साहित्य क्षेत्रात महत्वाची कामगिरी बजावणारे संत साहित्याचे अभ्यासक, त्रिपुरा राज्य विद्युत मंडळाचे माजी अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, तसेच महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश येथे वीज क्षेत्रात संचालक म्हणून काम केलेले डॉ. मुरहरी केळे यांना नुकतीच डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर तर्फे मराठी विषयात पीएच.डी. ही सर्वोच्य पदवी बहाल करण्यात आली आहे. त्यांनी "निवडक मराठी साहित्यातील विजेचे चित्रण : एक अभ्यास" या आगळया-वेगळया विषयावरील शोधप्रबंध त्यांनी विद्यापीठाला सादर केला होता.

डॉ. केळे यांनी आपल्या संशोधनात गेल्या एक हजार वर्षातील निवडक काव्यात्म, कथनात्म, नाट्यात्म साहित्याचा अभ्यास करून एका वेगळया विषयाकडे मराठी अभ्यासकांचे लक्ष वेधले आहे. विजविषयक साहित्याचा सामाजिक, सांस्कृतिक, अध्यात्मिक, भावनिक, वैज्ञानिक आशयांचा सखोल मागोवा घेतांना 'वीज' या संकल्पनेचा वैदिक साहित्यापासून संत-पंत-तंत साहित्याचा वेगवेगळया अंगाने मागोवा घेत प्राचीन, अर्वाचीन, आधुनिक आणि अत्याधुनिक साहित्याचा आढावा घेवून त्यांनी अभ्यासपूर्ण असे निष्कर्ष काढले आहेत. त्यांच्या अतिशय त्यांच्या हटके संशोधन कार्याचे मराठी साहित्य विश्वात कौतुक करण्यात येत आहे.

डॉ.मुरहरी केळे यांना शिक्षणाची प्रचंड आवड असून त्यांनी वेगवेगळ्या विद्यापीठांतून अभियांत्रिकी, व्यवस्थापन, कायदा, माहिती आणि तंत्रज्ञान, पत्रकारिता, उर्जा अंकेक्षण या वेगवेगळ्या व्यावसायिक विषयात दहा पदव्या घेतल्यानंतरही स्वस्थ न बसता नागपूर विद्यापीठातून 'पॉवर डीस्ट्रीब्यूशन फ्रान्चायसी' या विषयावर पहिली पीएच.डी. घेतली असतांना देखील मराठी विषयाची आवड असल्यामुळे त्यांनी मराठी भाषेत एम.ए.करून दुसरी पीएच. डी.मिळवली. या दुहेरी यशाबद्दल त्यांचे तेलंगणाचे राज्यपाल आणि त्रिपुरा राज्याचे माजी उपमुख्यमंत्री श्री. जिष्णू देव वर्मा, विद्यापीठाचे कुलगुरू, उपकुलगुरू यांचेसह विविध साहित्यिक, प्राध्यापक, अभ्यासक, समाजबांधव आणि वीज क्षेत्रातील सहकाऱ्यांकडून अभिनंदन होत असून, मराठी साहित्यातील त्यांच्या अमूल्य योगदानाची दखल घेतली जात आहे.

# रोहन घुगे यांचा फांगुळगव्हाण ग्रामस्थांतर्फे सत्कार



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : गेली वर्षानुवर्षे माशाचा ओहळ/ओढा/मोठा नाला यावर पुल, साकाव नसल्यामुळे गावातील७०/८०विद्यार्थ्यांना जीव धोक्यात घालून मोरोशी आश्रम शाळा येथे जावे लागत होते, ही बाब विविध वृत्तपत्र, इलेक्ट्रॉनिक्स मिडिया मधून प्रसिद्ध होताच आणि याची दखल दस्तुरखुद्द ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी घेऊन हा साकाव पुर्ण व्हावा म्हणून मोलाचे योगदान देणारे कर्तव्यदक्ष सीईओ श्री घुगे सर यांचा फांगुळगव्हाण ग्रामस्थांनी प्रसिद्ध माळशेज घाटाची फ्रेम देऊन आणि पेढे भरवून सत्कार केला, तसेच विविध कामांची यादी देखील त्यांना देण्यात आली, ही सर्व कामे ताबडतोब मार्गी लावण्याचे आश्वासन यावेळी ग्रामस्थांना देण्यात आले.

माळशेज घाटाच्या कुशीत वसलेल्या फांगुळगव्हाण गावातील ७० ते ८०विद्यार्थी मोरोशी आश्रमशाळा येथे जीव धोक्यात घालून जात होते,यामध्ये एक मुलगा वाहून देखील गेला होता, त्यामुळे ग्रामस्थांनी एकत्र येऊन स्वतः खर्चातून माशाचा ओहळ वर तात्पुरता पुल बांधला, ही बातमी पत्रकार संजय कांबळे, किरन कारभळ यांनी विविध वृत्तपत्रे व इलेक्ट्रॉनिक मिडिया मधून प्रसिद्ध केली, याची दखल जिल्हा परिषदेचे कर्तव्यदक्ष सीईओ रोहन घुगे ,खासदार बाळया मामा म्हात्रे, आमदार किसन कथोरे आदींनी घेतली,

शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी येथे भेटी दिल्या, यासाठी सुमारे ६० लक्ष रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला, त्याचे कामही पुर्ण झाले आहे, त्यामुळे यामध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडणारे सीईओ रोहन घुगे यांचे आभार व्यक्त करण्यासाठी आज पत्रकार संजय कांबळे यांच्या नेतृत्वाखाली फांगुळगव्हाण ग्रामपंचायतीचे सरपंच सविता भला, उपसरपंच राजू आंबो भला, पांडुरंग साबळे, विठ्ठल भला, तानाजी भला, ग्रामस्थ रवींद्र भला, पत्रकार किरन कारभळ कु हिमांशू कांबळे आदींनी सीईओ श्री घुगे यांची भेट घेऊन त्यांना पेढे भरवले तसेच प्रसिद्ध माळशेज घाट ची प्रतिमा भेट दिली,याप्रसंगी फांगुळगव्हाण चा मुख्य रस्ता, साखरवाडी येथे अंगणवाडी इमारत बांधणे, व्यायामशाळा व साहित्य, थितबी येथे पर्यटन विकास व साहित्य पुरविणे, सावर्णे गटार व अंतर्गत रस्ता, साखरवाडी रस्ता, पोहच रस्ता, फागुळगव्हाण दफनभूमी, आणि नवीन जिप शाळा आदी विविध कामांचे निवेदन सादर करण्यात आले. कर्तव्यनिष्ठ मुख्य कार्यकारी अधिकारी श्री घुगे यांनी ताबडतोब संबंधित विभागाना संपर्क साधून ही कामे मार्गी लावण्याचे आश्वासन दिले.

## आदिवासी आरोग्य अभ्यास समिती सदस्यांचा
# शहापूर तालुक्यातील अंगणवाडी केंद्रास भेट दौरा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : दि. २१ जून २०२५ रोजी शहापूर तालुक्यातील अंगणवाडी केंद्र मुसईवाडी, बीट शेणवा, प्रकल्प शहापूर येथे आदिवासी आरोग्य अभ्यास करणाऱ्या समितीचे सदस्य नरेश आकावरू (प्रोजेक्ट ऑफिसर, कळवण), हर्षाली घुले ( पॉलिसी रिसर्चर), ओवीया शंकरन (खुशी बेबी, इंटर्न) यांनी भेट दिली. आदिवासी भागातील बालकांचे पोषण, पूर्वप्राथमिक शिक्षण आणि माता बालसंगोपनावरील आरोग्यविषयक अंमलबजावणीबाबत प्रत्यक्ष पाहणी व संवाद साधण्यात आला.

भेटीदरम्यान समिती सदस्यांनी अंगणवाडी, पूर्व प्राथमिक शिक्षणात सहभागी होत मुलांसोबत संवाद साधला. तसेच गरोदर माता व स्तनदा मातांशी संवाद साधून त्यांच्या समस्यांची माहिती घेतली. अंगणवाडी सेविकेच्या मार्गदर्शनाने पोषण ट्रॅकर प्रणाली, सॅम (SAM) मुलांसाठी केल्या जाणाऱ्या उपाययोजना, दिला जाणारा नियमित आहार व 'अमृत आहार' याविषयी सविस्तर माहिती घेऊन चर्चा केली. या पाहणी दरम्यान अंगणवाडीत शिजवलेला आहार चाखून प्रत्यक्ष चव घेण्यात आली. मुलांसाठी व पालकांसाठी अंगणवाडी स्तरावर राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांबाबत सेविका व मदतनीस यांच्याशी सविस्तर संवाद साधण्यात आला.

या दौऱ्यात बालविकास प्रकल्प अधिकारी (शहापूर) धनश्री साळुंखे, तालुका वैद्यकीय अधिकारी (शहापूर), आरोग्य विभागाचे तालुका पर्यवेक्षक, प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी, आशा सेविका, तसेच इतर कर्मचारी उपस्थित होते. समिती सदस्यांनी केंद्रातील कार्याबाबत समाधान व्यक्त केले.

## शेतकऱ्यांच्या न्याय हक्कांसाठी खरेदी -विक्री संघा विरोधात
# माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे उपोषण

**२४ जून रोजी लाक्षणिक उपोषण**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड(दिलीप पवार)** : मुरबाड तालुका खरेदी विक्री संघाने सन 2021 ते 2024 या कालावधीत कोणतेही अधिकार नसताना तब्बल साडेतीन वर्ष बेकायदेशीर कारभार करून करोडो रूपयांचा आर्थिक गैरव्यवहार केला असल्याने संघाचे तत्कालीन चेअरमन व व्यवस्थापक यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल व्हावेत व अन्य मागण्यांसाठी माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे अध्यक्ष सुभाष बसवेकर यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य उपाध्यक्ष शंकर वडवले व महासंघाचे जिल्हा व तालुका पदाधिकारी येत्या 24 जून पासून आमरण उपोषणास बसत आहेत.

खरेदी -विक्री संघाच्या बचत खात्यातून चेअरमन व व्यवस्थापक यांनी स्वतःच्या नावाने रक्कम काढली असून त्या खर्चाची कशबुक मध्ये कुठेही नोंदी सापडत नाही. संघाचे नावे असलेले गाळे 99 वर्षाच्या करारावर 80 ते 100 रूपये भाड्याने दिल्याचे दाखवून प्रत्यक्षात हजारो रूपयांची वसुली केली आहे.दोन गाळयांची तर नोंदच नाही,संघाच्या नावाने चालवत असलेल्या 18 रास्त भाव धान्य दुकानामध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला असून त्याचे कागदपत्रे न देणे अशा सर्व गंभीर प्रकरणाची सखोल चौकशी करून सबंधित दोषींवर तात्काळ फौजदारी गुन्हे दाखल करावेत आदी मागण्यांसाठी मुरबाड तहसील कार्यालया समोर

माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे शंकर वडवले आमरण उपोषणाला बसणार असून तालुक्यातील शेकडो शेतकऱ्यांचा, सामाजिक क्षेत्रातील नागरिकांचा पाठिंबा मिळत आहे.

## आरोग्य
# ब्रेडचे दुष्परिणाम



### रोज ब्रेड खाल्ला तर काय होते?

ब्रेडमध्ये असलेले उच्च ग्लायसेमिक इंडेक्स रक्तातील साखरेचे प्रमाण वेगाने वाढवू शकते, ज्यामुळे मधुमेहाचा धोका वाढतो. ब्रेडमध्ये फायबर आणि व्हिटॅमिन ईची कमतरता असते, ज्यामुळे खराब कोलेस्ट्रॉल वाढू शकते आणि हृदयरोगाचा धोका वाढू शकतो. ब्रेडमध्ये असलेले ग्लूटेन आणि रिफाइंड कार्ब्स बद्धकोष्ठता, पोटदुखी आणि अतिसार यासारख्या समस्या निर्माण करू शकतात. कॅलरीज आणि कार्बोहायड्रेट्सचे प्रमाण जास्त असल्याने, जास्त ब्रेड खाल्ल्याने वजन जलद वाढू शकते. याशिवाय, दररोज ब्रेड खाल्ल्याने यकृत आणि मूत्रपिंडांवर वाईट परिणाम होऊ शकतो. ब्रेडमध्ये अनेक प्रकारचे प्रिझर्व्हेटिव्ह्ज आणि रसायने मिसळली जातात, ज्यामुळे शरीराच्या पचनसंस्थेवर परिणाम होऊ शकतो.

### मानसिक आरोग्यावर होणारे परिणाम

नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसिनच्या संशोधनातून असे दिसून आले आहे की दररोज ब्रेड खाल्ल्याने केवळ शारीरिकच नाही तर मानसिक आरोग्यावरही परिणाम होऊ शकतो. तज्ज्ञांच्या मते, ब्रेडमध्ये असलेले रिफाइंड कार्ब्स आणि ग्लूटेनमुळे नैराश्य, ताण आणि एकाग्रतेचा अभाव यासारख्या मानसिक समस्या उद्भवू शकतात. सतत ब्रेड खाल्ल्याने शरीरात जळजळ देखील होऊ शकते, ज्यामुळे मेंदूच्या कार्य करण्याच्या क्षमतेवर परिणाम होऊ शकतो.

## पडघ्यात मनसेच्या वतीने
# अंगणवाडी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**पडघा** : भिवंडी तालुक्यातील पडघा येथे मनसेच्या वतीने परिसरातील विविध अंगणवाडी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे संस्थापक अध्यक्ष राज ठाकरे यांचा वाढदिवस नुकताच साजरा करण्यात आला त्यांच्या वाढदिवसानिमित्त भिवंडी लोकसभा जिल्हाध्यक्ष शैलेश बिडवी यांच्या संकल्पनेतून पडघा विभागातील पॉवर हाऊस, सुंदरवन, चिकनघर येथील परिसरात राहणाऱ्या व अंगणवाडीतील गरीब व गरजू विद्यार्थ्यांना महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने विविध मान्यवरांच्या उपस्थितीत व पडघा पॉवर हाऊस अंगणवाडी सेविका गुलाब भुयाळ मदतनीस कल्याणी देवरे यांच्या हस्ते शैक्षणिक साहित्य व खाऊचे वाटप करण्यात आले.मनसेच्या या समाजसेवी उपक्रमाचे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे.

# डोंबिवलीत भव्य रोजगार मेळावा

## डोंबिवली शहरातील सर्व तरुण तरुणींना नोकरीचे सुवर्णसंधी...



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली(शरद शहाणे)**

उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना कल्याण जिल्हाध्यक्ष दीपेश पुंडलिक म्हात्रे आयोजित भव्य रोजगार मिळावा. डोंबिवली पश्चिम सह्याद्री शिवसेना कार्यालय डोंबिवली येथे सर्व बेरोजगार तरुण-तरुणींसाठी भव्य रोजगार मिळायचे आयोजन करण्यात आले आहे या मेळाव्यात 18 ते 40 वयोगटातील सर्वांसाठी नोकरीसाठी सुवर्ण संधी उपलब्ध होत आहे त्यामुळे तरुणाईला एक जोश निर्माण झाला आहे.सकाळी दहा ते पाच वाजेपर्यंत चालणाऱ्या या कार्यक्रमात अनेक तरुण तरुणींनी उपस्थिती दर्शवली कार्यालयात फक्त पाच दिवस काम असून दोन दिवस सुट्टी आहे म्हणजेच फायूडे विक आहे. डोंबिवली पर्यंत कंपनीचे बस सेवा सुद्धा उपलब्ध आहे. दहावी बारावी पास झालेल्या, कुठलाही अनुभव नसलेल्या गरजूंना नोकरीची संधी आहे.

दरम्यान या कार्यक्रमात शिवसेना कार्यकर्ते कल्पेश म्हात्रे ,राजेंद्र धात्रक, गणेश मिसाळ, सावंत अशा अनेक कार्यकर्त्यांच्या मेहनती मुळे हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.

# कल्याण आरटीओ क्षेत्रात रिक्षा भाडेवाढ लागू

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण आरटीओ क्षेत्रात रिक्षा भाडेवाढ लागू करण्यात आली असून मीटर भाड्यात 3 रुपये वाढ तर शेअर भाड्यात 3 ते 5 रुपयांची वाढ करण्यात आली आहे. रिक्षाची भाडे वाढ चार महिन्याच पूर्वी सरकारने दिली आहे. पूर्वी रिक्षाचे मीटर भाडे २३ रुपये होते. त्यात तीन रुपये वाढ करुन २६ रुपये करण्यात आले आहे. प्रवाशांना बोजा पडू नये म्हणून आम्ही भाडेवाढ लागू केलेली नव्हती.

रिक्षा मीटरचे रिकॅलीब्रेशन होणे बाकी होते. आत्ता ९५ टक्के काम झाले आहे. वाहतूक शाखेकडून ओवर सीटवर कारवाई सुरु केली आहे. दहा हजार रुपयांचा दंड वसूल केला जात आहे हे अन्यायकारक आहे. याबाबत सरकारकडे दाद मागणार असून भाडेवाढ प्रत्येक रूट आणि शहरात झाली आहे. शेअर रिक्षात तीन ते चार रुपये भाडे वाढ करण्यात आलेली आहे. महागाई ही प्रत्येकाला आहे. त्यानुसार ही भाडेवाढ सरकारने दिली असून प्रवाशांनी सहकार्य करण्याचे आवाहन रिक्षा टक्सी चालक मालक संघटनेचे उपाध्यक्ष संतोष नवले यांनी दिली.





### मेष
समाजातील उच्चपदस्थ आणि प्रतिष्ठित लोकांशी संपर्क वाढतील. स्वतःवर विश्वास ठेवा. फळ क्षेत्राशी संबंधित लोकांना व्यवसायात फायदा होईल.

### वृषभ
व्यवसायावर लक्ष केंद्रित करा. अन्यथा, व्यवसायातील अस्थिरतेमुळे तोटा होऊ शकतो. विद्यार्थ्यान अभ्यासाकडे नीट लक्ष द्यावे.

### मिथुन
तुम्हाला शासन आणि सत्तेचा फायदा मिळेल. राजकारणात तुमचे स्थान आणि प्रतिष्ठा वाढेल. तुम्हाला काही महत्त्वाच्या कामात यश मिळेल.

### कर्क
व्यवसायात संयमाने आणि परिश्रमाने काम करा. तुमच्या व्यवसायात प्रगती आणि उन्नती होईल.तुमचे आरोग्य चांगले ठेवण्यासाठी, नियमित व्यायाम करा.

### सिंह
तुमच्या आयुष्यात असे काही घडू शकते जे तुम्ही कधीही स्वप्नातही पाहिले नसेल. कामाच्या ठिकाणी कनिष्ठ कर्मचाऱ्यांमुळे मतभेद होऊ शकतात.

### कन्या
कोणाच्याही फसवणुकीत अडकू नका. तुमच्या बुद्धिमत्तेने आणि विवेकबुद्धीने काम करा. सामाजिक कार्यात रस कमी होईल.

### तूळ
व्यवसाय क्षेत्रात गुंतलेल्या लोकांना चढ-उतारांचा सामना करावा लागेल.पोट आणि हाडांशी संबंधित आजारांची विशेष काळजी घ्या.

### वृश्चिक
जर तुम्हाला अपघातात दुखापत झाली किंवा दुखापत झाली तर योग्य उपचार करून घ्या. परदेश प्रवास किंवा स्थलांतराचे संकेत आहेत. मोठ्या

### धनु
कामांचे विचार मनात येत राहतील. बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या लोकांना दूरच्या देशांमध्ये आणि परदेशात जाण्याची संधी मिळेल.

### मकर
तुमच्या महत्त्वाकांक्षा जास्त वाढू देऊ नका. आईकडून आर्थिक मदत मिळण्याची शक्यता आहे. तुमचा आत्मविश्वास वाढेल

### कुंभ
मालमत्ता खरेदी-विक्रीशी संबंधित बाबींमध्ये तुमच्या जवळच्या मित्रांकडून सहकार्य मिळेल. या बाबतीत कोणताही घाईघाईने निर्णय घेऊ नका.

### मीन
आर्थिक परिस्थिती सुधारेल. महत्त्वाच्या कामात यश मिळेल. स्वादिष्ट जेवणाचा योग आहे. तुम्ही लांबच्या प्रवासाला जाऊ शकता. महत्त्वाकांक्षा पूर्ण होतील.








# गावांचा विकास सार्वजनिक बांधकाम ऐवजी जिल्हा परिषदेच्या माध्यमातून करावा

### - पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांच्या सूचना



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** - जिल्हा परिषदेवरील लोकांचा विश्वास कायम राहण्यासाठी यापुढे ग्रामविकास विभागाकडून मंजूर होणारी कामे सार्वजनिक बांधकाम विभागाऐवजी जिल्हा परिषदेच्या माध्यमातूनच राबवावित, अशा स्पष्ट सूचना ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांनी प्रशासनाला दिल्या. ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा समिती सभागृहात केंद्र व राज्य पुरस्कृत कामांच्या आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीनंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. ठाणे जिल्ह्यात केंद्र व राज्य शासनाच्या माध्यामतून विविध विकास कामे सुरु आहेत. या कामांचा आढावा घेण्यासाठी ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे आले होते. यावेळी खासदार सुरेश म्हात्रे, आमदार किसन कथोरे उपस्थित होते.

ग्रामविकास विभागाकडून मंजूर होणारी कामे ही सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात यावी अशी मागणी अनेकदा होते असे निर्दशनास आले आहे. कारण, सार्वजनिक बांधकाम विभागाची देयक पद्धत ही सोपी आहे तर, जिल्हा परिषदेची देयक पद्धत ही अधिक वेळ घेणारी आहे. त्यामुळे काम करणाऱ्यांचा कल सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सर्वाधिक असतो. परंतू, जिल्हा परिषदेतील कामकाजात काही बदल करुन ही कार्यप्रणाली कशी सोपी होईल यावर लवकरच निर्णय घेतला जाईल. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाप्रमाणे उच्च दर्जाचे काम जिल्हा परिषदेने करावे, यासाठी ज्या सुधारणा करणे अपेक्षित आहे. त्या करण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या आहेत, अशी माहिती मंत्री जयकुमार गोरे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या बैठकीत मुख्यमंत्री १०० दिवसांच्या कार्यक्रमाचा आढावा घेण्यात आला. त्याचबरोबर, प्रधानमंत्री आवास योजनेच्या पहिल्या टप्प्यात २० लाख घरांची मान्यता देण्याचे काम विक्रमी वेळेत करण्यात आले. तर, १० लाख ५० हजार घरांना पहिला हप्ता देण्यात आला. तसेच नव्याने १० लाख घरे मंजूर झाली असून वर्षानुवर्षे घरांची प्रतीक्षा असलेली घरांची यादी संपली आहे, असे सांगत ठाणे जिल्ह्यात ती शून्य असल्याचे गोरे यांनी नमूद केले.

# वाहतूक कोंडीवर उपाययोजना करा

### - आमदार विलास तरे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पालघर:** मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग क्र. ४८ वर गेल्या आठवड्याभरापासून मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होत असून यावर ठोस उपाययोजना करावी असे स्पष्ट निर्देश आमदार विलास तरे यांनी महामार्ग वाहतूक पोलीस यांना बैठकीत दिले आहे. यावेळी आमदार तरे म्हणाले की, मुंबई अहमदाबाद महामार्ग मुंबई व गुजरात राज्यांना जोडणारा नसून, तो महाराष्ट्राच्या औद्योगिक, व्यावसायिक व वैद्यकीय, आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत दृष्टिकोनातूनही अत्यंत महत्त्वाचा आहे. या पार्श्वभूमीवर, वाहतूक कोंडी समस्येवर तातडीने उपाययोजना करा, वाहतूक नियोजनात सुधारणा करा, संबधित यंत्रणांमध्ये समन्वय साधून नागरिकांना दिलासा मिळवून देणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने, ही बैठक बोलावण्यात आली आहे, असे बोईसरचे आमदार विलास तरे यांनी सागितले.


## कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

दुरध्वनी क्र. ०२५१-२२०३६२१

### महिला व बालकल्याण विभाग

-: जाहीर सूचना :-

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेतील महिला व बालकल्याण विभागामार्फत खालील तक्त्यात नमूद योजना लागू करण्यात आलेल्या आहेत.

| अ. क्र. | तपशिल | अनुदान रक्कम |
|---|---|---|
| १ | कन्यादान योजना:- निराधार / विधवा / परित्यक्त्या/घटस्फोटीत महिलांच्या मुलीचे विवाहाकरिता अनुदान देणे. | २०,०००/- प्रती लाभार्थी |
| २ | विधवा पत्नीस अनुदान: घरातील कर्त्या पुरुषांचे निधन झाल्यांस त्याचे विधवा पत्नीस अनुदान देणे. | १०,०००/- प्रती लाभार्थी |
| ३ | सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना व सावित्रीबाई फुले स्पर्धा परिक्षा अनुदान योजना | १,००,०००/- प्रती लाभार्थी |

- सदर योजनांबाबतचे अर्ज महिला व बालकल्याण विभाग व कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे अधिकृत संकेतस्थळ www.kdmc.gov.in येथे उपलब्ध आहेत.
- अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारिख २३/०७/२०२५
- अर्ज दाखल करण्याचे ठिकाण : महिला व बालकल्याण विभाग, महापालिका मुख्यालय, कल्याण डोंबिवली महानगरपालिका

सही/-
(कांचन गायकवाड)
उप आयुक्त,
महिला व बाल कल्याण विभाग
कल्याण डोंबिवली महानगरपलिका

* जावक क्रमांक :-
कडोंमपा/जसवि/मुका/२१९
दिनांक - २३ जून २०२५




कुणबी समाज भिवंडी शहराच्या वतीने भिवंडी येथे १० वी आणि १२ वीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा संपन्न झाला. यावेळी आमदार किसन कथोरे यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांचा सत्कार केला. आवडीच्या आणि उपयुक्त क्षेत्रात प्राविण्य मिळवून उज्ज्वल भविष्य घडवा, आई-वडिलांसह समाजाचा लौकिक वाढवा, असा सल्ला देत विद्यार्थ्यांशी संवाद साधला. याप्रसंगी जिजाऊ शैक्षणिक व सामाजिक संस्थेचे अध्यक्ष निलेशजी सांबरे आणि कुणबी समाज भिवंडी शहराचे सर्व पदाधिकारी, विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुंबई बाजार समितीतील रखडलेल्या मसाला मार्केटचा पुनर्विकास प्रस्ताव मार्गी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई :** एपीएमसीतील मसाला मार्केटमधील मध्यवर्ती सुविधा इमारतीचा रखडलेला पुनर्विकास प्रस्ताव अखेर मार्गी लागला असून, या इमारतीच्या पुनर्बाधणीला कार्यालयधारकांनी एकमुखी संमती दिली आहे. महापालिकेने सदर इमारत 'अतिधोकादायक ठरवत तिचा वीज आणि पाणीपुरवठा १८ जूनपासून खंडित केला होता. त्यानंतर लगेचच १९ जून रोजी वाशीतील पाम बीच मॉलमध्ये झालेल्या व्यापारी व कार्यालयधारकांच्या बैठकीत बहुसंख्यांनी पुनर्विकासाच्या प्रस्तावाला मंजुरी दिली. या बैठकीत २७२ कार्यालयधारकांपैकी १८० हून अधिक गाळाधारक उपस्थित होते. बैठकीस संचालक विजय भुत्ता, मोहन गुरनानी, अशोक जैन, दीपक शाह, अमरीशलाल बारोट यांच्यासह अनेक प्रमुख व्यापाऱ्यांची उपस्थिती होती. बहुमताच्या आधारावर इमारतीच्या पुनर्बाधणीचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला.

पुनविकास प्रस्ताव लवकरच संचालक मंडळाच्या पुढील बैठकीत सादर केला जाणार असून, तेथे अंतिम मंजुरी मिळाल्यानंतर प्रत्यक्ष बांधकामास सुरुवात होईल, अशी माहिती उपसचिव महेश साळुंखे-पाटील यांनी दिली.

# मिरा भाईदरमध्ये डेंग्यूचा प्रसार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भाईंदर :** मिरा भाईंदर शहरात डेंग्यू आजाराचा प्रादुर्भाव वाढू लागला आहे. सध्या शहरात ४० रुग्ण डेंग्यूने ग्रस्त असून, पावसाळ्यात हा आकडा वाढण्याची भीती निर्माण झाली आहे. त्यामुळे नागरिकांनी विशेष काळजी घेण्याचे आवाहन महापालिकेकडून करण्यात येत आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत शहरात डेंग्यू व मलेरिया सारख्या साथीच्या आजारांचा प्रसार होऊ नये म्हणून विविध स्वरूपाच्या उपाययोजना राबवण्यात येतात. यात प्रामुख्याने औषध फवारणी, पाणी शुद्धीकरण आणि स्वच्छतेचा समावेश आहे. मात्र तरीही डेंग्यू व मलेरिया या साथरोगांची लागण होऊन बाधित होणाऱ्यांचे प्रमाण पालिकेच्या नोंदीनुसार वाढतच असल्याचे दिसून येत आहे.

# संतोष सुरोशी शिवसेना जिल्हा संघटक पदी



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड :** मुरबाड _कल्याण या राष्ट्रीय महामार्गावर असलेल्या रायते गावचे माजी सरपंच संतोष नामदेव सुरोशी यांची शिवसेनेच्या जिल्हा संघटक पदी नियुक्ती शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार करण्यात आली आहे.

या अगोदर संतोष सुरोशी यांनी युवा सेना तालुकाप्रमुख, संपर्क संघटक कल्याण तालुका, युवा सेना जिल्हा समन्वयक ही पदे भूषविली आहेत. सध्या त्यांच्या धर्मपत्नी समिता सुरोशी या ग्रुप ग्रामपंचायत रायते पिंपळोलीच्या सरपंच आहेत. रस्ते, पाणी, वीज, शैक्षणिक, सामाजिक प्रश्न गावागावात जाऊन सोडवण्यासाठी मी कटिबद्ध असणार तसेच आदरणीय पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी जो विश्वास दाखवून जिल्हा संघटक पदी माझी नियुक्ती केली त्या विश्वासाला कुठेही तडा जाऊ देणार नाही आणि जिल्ह्यातील प्रत्येक घराघरात जाऊन पक्ष संघटना मजबूत करणार असा आत्मविश्वास या निमित्ताने संतोष सुरोशी यांनी बोलून दाखवला आहे.

# नवीन ठेक्यात जुन्या सफाई कर्मचाऱ्यांना प्राधान्य द्या

## श्रमजीवी कामगार संघटनेची मागणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण डोंबिवली महानगर पालिकेच्या घनकचरा विभागातील नवीन ठेकेदार सुमित अल्को पास्ट कंपनीने सफाई कर्मचाऱ्यांची नवीन भरती न करता जुन्या कर्मचाऱ्यांना प्रथम प्राधान्य देण्याची मागणी श्रमजीवी कामगार संघटनेने केली आहे. कल्याण डोंबिवली महानगरपालिका आयुक्त अभिनव गोयल आणि श्रमजीवी कामगार संघटना कार्याध्यक्ष सुलतान पटेल तसेच संघटनेचे कल्याण युनिटचे कार्यकर्ते यांची बैठक घेण्यात आली यावेळी हि मागणी करण्यात आली.




श्रमजीवी कामगार संघटनेच्या सभासदांची यादी आयुक्तांना देण्यात आली असून आयुक्तांनी मी ठेकेदाराला सांगून प्रयत्न करतो असे आश्वासन दिले. त्यावेळेस श्रमजीवी कामगार संघटनेचे कार्याध्यक्ष सुलतान पटेल यांनी सांगितले की जर आमच्या सभासदांना कामावर घेतले नाही तर येणाऱ्या 25 तारखेला राज्य सफाई कामगार आयोगाचे स्वागत आम्ही आमच्या पद्धतीने करू आम्ही आमच्या हक्काचा लढा कायम पुढे ठेऊ असा इशारा यावेळी दिला. संघटनेचे युनिट प्रमुख तसेच पदाधिकारी अमित साळवे, प्रविण बेटकर, नितीन काळण, सागर सोनावणे, दिनेश तरे, सचिन भाटकर, गौतम सोनावणे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## पिसवली प्रभागातील पाईपलाईन परिसरातील अंतर्गत रस्त्यांसाठी २५ लाखांचा निधी मंजूर



### कल्याण ग्रामीण शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे शहरप्रमुख अमित कोळेकर यांच्या पाठपुराव्याला यश

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** पिसवली प्रभागातील कल्याण ग्रामीण शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे शहरप्रमुख अमित कोळेकर यांच्या पाठपुराव्याला यश आले असून खासदार डॉ. श्रीकांत शिंदे व आमदार राजेश मोरे यांच्या माध्यमातून 25 लाखांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. गेल्या 7 ते 8 वर्षांपासून रखडलेल्या पिसवली प्रभागातील पाईप लाईन रोडच्या अंतर्गत येणारे अतितातडीच्या सोसायटीकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कामासाठी हा निधी मंजूर करण्यात आला आहे. प्रभागातील नागरिक यामुळे सुखावले असून पिसवली प्रभागाला सक्षम व प्रयत्नशील नेतृत्व मिळाल्याने नागरिकांनी आभार मानून आनंद व्यक्त केला.

# सह्याद्री सामाजिक संस्थेचा कौटुंबिक मेळावा संपन्न

### सह्याद्री रत्न पुरस्कार आणि विद्यार्थ्यांचा गुणगौरव समारंभ

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली :** डोंबिवली पूर्वेकडील एस व्ही जोशी हायस्कूल हॉलमध्ये सह्याद्री सामाजिक संस्थेचा तिसरा वर्धापन दिन, सह्याद्री रत्न पुरस्कार आणि दहावी बारावी मध्ये भरघोस मार्क मिळून यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव समारंभ असा भरगच्च कार्यक्रम आयोजित केला होता.
या कार्यक्रमात संस्थेचे सर्व पदाधिकारी कार्यकर्ते आणि त्यांचे कुटुंब असा कौटुंबिक कार्यक्रम मोठ्या थाटामाटात संपन्न झाला या कार्यक्रमाला अनेक सामाजिक राजकीय आणि सिने सृष्टीतील मान्यवर उपस्थित होते.या कार्यक्रमात महिलांचे हळदी कुंकू आणि महिलांचा पैठणी जिंकण्याचा आवडता कार्यक्रम आणि स्नेह भोजनाचा कार्यक्रम संपन्न झाला.या कौटुंबिक मेळाव्यात अनेक मान्यवरांनी आपले विचार मांडले, विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.
या कार्यक्रमात कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश गोवर्धन मोरे. राजेश कदम, भारतीय जनता पार्टीचे कल्याण जिल्हा अध्यक्ष नंदकिशोर घनश्याम परब ., सौ. अपर्णा संजय पावशे सदानंद चळवळ सल्लागार सुलेखा गटकळ अभिनेता संजय खापरे सह्याद्री रत्न पुरस्कार विजेते ह भ प प्रकाश जी म्हात्रे डॉक्टर रामचंद्र जाधव डॉक्टर भूषण पाटील सोनल ठाकरे समाजसेवक सुरेंद्र ठोके असे अनेक मान्यवर कार्यक्रमास उपस्थित होते.

नियमित वाचा
दै. ठाणे
जीवनदीप वार्ता






# अनोळखी इसमाच्या खुनाचा उलगडा : स्थानिक गुन्हे शाखा पोलिसांची कामगिरी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामिण :** कल्याण तालुका पोलीस ठाणे अंतर्गत असलेल्या नालिंबी गाव हद्दीत दिसून आलेल्या एका अनोळखी इसमाच्या खुनाचा तपास करुन उलगडा करण्याची कामगिरी स्थानिक गुन्हे पोलिसांनी केली आहे.

कल्याण तालुका पोलीस ठाणे अंतर्गत असलेल्या नालिंबी गाव हद्दीतील नालिंबी ते अंबरनाथ बाजुकडे जाणारे रोडच्या बाजुला असलेल्या जंगल भागात दि. 29 मे रोजी कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणावरुन अनोळखी पुरुष जातीच्या इसमाचे मुंडके धडापासुन वेगळे करुन सदर मुंडके कोठेतरी घेवुन जावुन जिवे ठार मारुन प्रेत टाकुन दिले असल्याचे दिसून आले होते. याबाबत आणेगांव पोलीस पाटील संगीता शिंदे यांनी दिलेल्या फिर्यादी वरुन कल्याण तालुका पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद करण्यात आली होती.



सदर, गुन्हयाचे गांभीर्य पाहुन ठाणे ग्रामीण पोलीस अधिक्षक डॉ.डी.एस. स्वामी, अपर पोलीस अधीक्षक भारत तांगडे यांनी घटनास्थळी भेट देत गुन्हा उघडकीस आणणेकामी कामी आदेश देवुन मार्गदर्शन केले. त्या प्रमाणे समांतर तपास करण्याकरीता स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरेश मनोरे यांनी सदरचा गुन्हा उघडकीस आणणे कामी वेगवेगळी पथके तयार करुन त्यांना मार्गदर्शन केले.

या अनुषंगाने सदर सर्व पथकांनी अहोरात्र अथक परीश्रम घेवुन घटनास्थळापासुन सी.सी.टीव्ही माध्यमातून तर महाराष्ट्र राज्यातील पोलीस ठाण्यांतील मिसींग बाबत माहीती प्राप्त करुन, तसेच अनोळखी मृतदेहाचे फोटोचे बॅनर ( स्टिकर) बनवुन ते ठिक ठिकाणी चिकटवुन त्याबाबत माहीती प्रसिध्द केली. त्याचबरैबर राज्यातील विविध व्हॉटसअप ग्रुप द्वारे अनोळखी मृतदेहाची माहीती देवून ती प्रसिध्द करण्यात आली. अशातच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उप निरीक्षक महेश कदम व त्यांचे पथक तपास करीत असताना गोपनीय माहीतीच्या आधारे सदर गुन्ह्याच्या घटनास्थळ परीसरात एक सशंयित कार दिसली. सदर कारबाबत अधिक तपास केला असता सदरची कार ही सलमान महंमद गौरी अन्सारी (वय 25 वर्षे ) रा.मांडा टिटवाळा याची असल्याचे समजले. त्यास ताब्यात घेवुन गुन्ह्याचे अनुषंगाने कौशल्य पूर्ण विचारपुस केली असता मयत हा त्याचा सावत्र भाऊ फैसल महंमद गौरी अन्सारी (वय 29) रा. मांडा टिटवाळा असुन त्यांच्यातील आपसातील सतत भांडणे व प्रॉपर्टी वरुन वाद होता. त्यामुळे त्याचा खुन केल्याची कबुली सलमान महंमद गौरी अन्सारी यांनी
दिल्याने त्यास पुढील तपास कामी कल्याण तालुका पोलीस ठाणे यांचे ताब्यात देण्यात आलेले असल्याची माहिती दिलेल्या प्रसिद्धी पत्रकाद्वारे स्थानिक गुन्हे शाखेच्या सुत्रांनी दिली आहे.

सदरचा गुन्हा तपास पोलीस अधिक्षक डॉ.डी.एस. स्वामी, अपर पोलीस अधीक्षक भारत तांगडे यांच्या मार्गदर्शनाखाली, स्थानिक गुन्हे शाखेचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक सुरेश मनोरे यांच्या अधिपत्यामधील सहा.पो.नि. श्रीकांत शिंदे, पो.उप नि. महेश कदम, सहा.फौ. धनाजी कडव, पो.हवा.प्रकाश साईल, संतोष सुर्वे, सतीष कोळी, गोविंद कोळी, हेमंत विभुते, भगवान सोनावणे, जितेंन्द्र वारके, शशिकांत पाटील, योगेश शेळकंदे, पो.शि.स्वप्नील बोडके तसेच सायबर विभागाचे पो. हवा. दिपक गायकवाड, रविंद्र मोरे यांच्या पथकाने उघडकीस आणलेला आहे. तर सदर गुन्हयाचा पुढील तपास कल्याण तालुका पोलीस ठाणे प्रभारी पोलीस निरीक्षक बाळा कुंभार हे करीत आहेत.

जीवनदीप वार्ता

# अवैधरित्या शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाई

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : महाराष्ट्र मोटार वाहन (स्कूल बसकरिता विनियम) नियम, 2011 दि.22 मार्च 2011 मधील नियम 5 नुसार शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीसंबंधीत स्कूल बस धोरणानुसार मुलांच्या सुरक्षिततेसंदर्भात दि.18,19 व 20 जून 2025 या तीन दिवसांमध्ये अवैधरित्या शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या 121 वाहनांवर मोटार वाहन कायदा 1988 व शालेय स्कूल बस नियमावली 2011 नुसार थेट कारवाई करण्यात आली आहे.

या तपासणीमध्ये वाहनांच्या सर्व वैध कागदपत्रास महाराष्ट्र वाहन (स्कुलबसकरिता विनियम) नियम 2011 मध्ये विहित केलेल्या सुरक्षिततेच्या शालेय परवाना, विद्यार्थी संख्या, चालकाचे वैध संवर्गातील अनुज्ञप्ती व बॅज, महिला सहवर्ती तपासणी करण्यात आली.

उप प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत शालेय प्रथम सत्र सुरु होण्याच्या सुरुवातीस शालेय वाहनांची काटेकोरपणे तपासणी करण्यात येते, असे कल्याण उप प्रादेशिक परिवहन अधिकारी आशुतोष बारकुल यांनी कळविले आहे.



## शांतीदुत परिवार संस्थेच्या वतीने सुप्रसिद्ध अभिनेत्यांना सेवा रत्न पुरस्कार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : संपूर्ण महाराष्ट्रात सामाजिक कार्य करणाऱ्या " शांतीदुत परिवार " या संस्थेच्या माध्यमातून नुकताच जेष्ठ अभिनेते सचिन खेडेकर व महाराष्ट्राची हास्यजत्रा व सम्या सम्या मैफिलीत माझ्या "फेम सुप्रसिद्ध अभिनेते समीर चौघुले,अभिनेत्री विशाखा सुभेदार यांचा कला क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देत असल्यामुळे "शांतीदूत सेवा रत्न"पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.त्यामुळे मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

महाराष्ट्र शांतीदूत परिवाराचे संस्थापक अध्यक्ष तथा राज्याचे विशेष पोलीस महानिरीक्षक डॉ.विठ्ठलराव जाधव (सेनि) यांच्या हस्ते बालगंधर्व रंग मंदिर येथे नागरी सत्कार करण्यात आला.या वेळी शांतीदूत परिवाराचे पदाधिकारी प्रा इंद्रजीत भोसले,राष्ट्रीय महिला अध्यक्ष विद्याताई जाधव,तृषाली जाधव,शितल चौधरी, डॉ.योगेश्वरी कराळे, रोहिणी कोळेकर प्रा.विलास कदम,मधुकर चौधरी,नितीन दुधाटे,मितेश भोसले,विजय ठुबे, व मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते. महाराष्ट्र राज्य ही संताची भूमी आहे येथे नेहमी कलाकारांच्या गुणांना प्रोत्साहन दिले जात आहे. केंद्र व राज्य शासन नेहमी कलाकारांचा गौरव करत असते त्याच प्रमाणे शांतीदुत परिवार सुध्दा शालेय विद्यार्थी,होतकरू महिला, खेळाडू व कलाकारांचे गुणांना प्रोत्साहन देण्यासाठी देण्यासाठी नेहमी सक्रिय असल्याची माहिती संस्थापक अध्यक्ष डॉ. विठ्ठलराव जाधव यांनी या कार्यक्रमात दिली. झालेल्या भव्य सत्कार सोहळा कार्यक्रमात कला क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देत असल्याबद्दल शांतीदूत सेवा रत्न पुरस्कार देऊन सचिन खेडेकर, समीर चौघुले, विशाखा सुभेदार यांचा गौरव करण्यात आला. कोविड च्या भयंकर तणावाच्या काळात सचिन खेडेकर तसेच समीर चौघुले व त्यांच्या संपूर्ण हास्यजत्रा कलाकारा रसिकांना मदत व आनंदाचे क्षण उपलब्ध करून दिले.त्यामुळे त्याचे व संपूर्ण टीम चे हे ऋण अविस्मरणीय आहेत असे गौरव उद्गार जाधव यांनी व्यक्त केले.या कार्यक्रमास मोठ्या संख्येने महिला व नागरिकांसह शांतीदुत परिवाराचे सदस्य पदाधिकारी उपस्थित होते.

**शांतीदुत परिवार संस्थेचे महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात सदस्य व पदाधिकारी काम करीत आहेत. रक्तदान शिबिर,अवयव दान शिबीर,आरोग्य चिकित्सा शिबिर,योग साधना,ध्यान शिबीर,सांस्कृतिक कार्यक्रम त्याचबरोबर महाराष्ट्रातील महापुरुष यांच्या जयंती उत्सव सारखे कार्यक्रम करीत असतात अशी माहिती यावेळी डॉ.विठ्ठल जाधव यांनी दिली.**

## खडवली येथील नागरीक पाच दिवसांपासून अंधारात

### विज वितरण कंपनी कर्मचाऱ्यांचे दुर्लक्ष


दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता


5:30
MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd
Maharashtra State Electricity Distribution Company Limited
Consumer Feedback

| | |
|---|---|
| Complaint ID : | 0000036811664 |
| Submitted Complaint Resolution : | UnResolved |
| Submitted Service Rating/Remarks : | Repeated Complaint But Issue Unresolved |

**पडघा** : कल्याण तालुक्यातील दुर्गम भागात असलेल्या खडवली येथील एक नागरीक पाच दिवसापासून अंधारात असुन विज वितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांचे जाणुनबुजुन दुर्लक्ष होत आहे.

खडवली पूर्व येथील स्वप्नसाकार कॉम्प्लेक्स मध्ये अशोक बुधाजी पाटील यांचे कपड्याचे दुकान असुन त्यावर त्यांचा उदरनिर्वाह चालतो त्यांचा विज ग्राहक क्र. 021110005587असुन या ग्राहकाचा १९ जुलै २०२५ पासून विद्युत खांबावरील बिघाडामुळे विद्युत पुरवठा पाच दिवसापासून खंडित झाला असून दुकानात विज नसल्याने त्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. त्या बाबत दिनांक १९ जुलै रोजी दुपार नंतर त्यांनी कनिष्ठ अभियंता खडवली यांना फोन करून कळविले असता त्यांनी फोन उचलला नाही. त्यानंतर अशोक पाटील यांनी महावितरण कपंनीच्या टोल फ्री क्रमांकावर सायंकाळी ७ वाजेनंतर तक्रार दाखल केली, त्याचा तक्रार क्रमांक 0000036784912 असुन खडवली येथील येथील कनिष्ठ अभियंता यांना फोन द्वारे कळविले. त्या नंतर पुन्हा दिनांक २१ जुलै २०२५ रोजी पुन्हा खडवली येथील कनिष्ठ अभियंता यांना विज जोडणी झाली नसल्याचे कळविले त्यानुसार त्यांनी फोन वरून आमचा विजतंत्री कर्मचारी श्री. बागुल यांना पाठवतो ते विज पुरवठा सुरू करतील असे सांगितले त्या नंतर विजतंत्री कर्मचाऱ्याची तासन तास वाट पाहून सुद्धा एकही कर्मचारी पाटील यांच्या दुकानाची विज चालू करण्यासाठी फिरकला नाही. त्यामुळे आतापर्यंत ७२ तासा पेक्षा जास्त वेळ होऊन सुद्धा विज पुरवठा सुरू केला गेला नाही.त्यामुळे दुकानाचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.त्यामुळे विज वितरण कंपनीचे खडवली येथील ग्राहक अशोक पाटील हवालदिल झाले आहेत. तसेच विज वितरण कंपनीचा वरिष्ठ अधिकारी कनिष्ठ कर्मचाऱ्याला सांगून किंवा आदेश करून सुद्धा कर्मचारी ऐकत नसेल तर ही गंभीर बाब असुन विज वितरण कंपनीचे अधीकारी व तांत्रिक कर्मचारी मनमानी कारभार करीत आहेत असा आरोप खडवली येथील नागरिक करीत आहेत. तरी या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन आपल्या कामात कुचराई करुन जाणुन बुजून खडवली येथील विज ग्राहकांना अंधारात ठेवणाऱ्या अधीकारी व कर्मचाऱ्यांवर सेवा हक्क कायद्या अंतर्गत चौकशी करून दोषीवर निलंबनाची कारवाई करावी व दुकानाच्या गाळयाची विज पूर्ववत करण्याची मागणी अशोक पाटील यांनी अधीक्षक अभियंता, मुख्य अभियंता, कार्यकारी अभियंता महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी कल्याण यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.




## डॉ.पंकज पाटील यांनी केली पुणे- पंढरपूर सायकलवारी!

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड** : मुरबाड तालुक्यातील शिवळे येथे गेली अनेक वर्ष गोर गरीब रुग्णांना अल्प दरात डॉ.पंकज पाटील वैद्यकीय सेवा देत असून अनेक उपक्रमही रबावत आहेत. आपले आरोग्य चांगले राहिले पाहिजे या करिता आलेल्या रुग्णां बरोबर व नातलगाना मार्गदर्शन करत असून कमी दरात चांगली सेवादेणारे डॉ.पंकज पाटील देवदूत ठरले आहेत. आपल्या आरोग्या करिता चांगला आहार,व्यायाम,योगा बरोबर सायकलींग केल्याने फिटनेस चांगले राहत असल्याचे म्हणाले.

शिवळे येथील आपल्या क्लिनिक मध्ये सकाळ पासून ते संध्याकाळ पर्यंत रुग्णांना सेवा देण्यात व्यस्त असतांनाही वेळ काढून इन्डो ॲथलेटिक्स सोसायटी वतीने पुणे-पंढरपूर-पुणे सायकलवारी मध्ये सहभा घेऊन वेगळा आदर्श घालून दिला आहे. सायकल वारीचे प्रस्थाण 7 जून 2025 रोजी देहू गाथा मंदिर येथून करण्यात आले होते.या सायकलवारी मध्ये तब्बल 1850 सायकलपटूंनी सहभाग नोंदवला होता. पुणे-पंढरपूर-पुणे सायकलवारीमध्ये सायकलस्वार महिला,तरुण मुले,मुली,जेष्ठ नागरिक विविध क्षेत्रातील देशाच्या कानाकोपऱ्यातील नागरिकांनी सहभाग नोंदवून अविस्मरणीय अनुभव अनुभवल्याचे चित्र त्याच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होते.या सायकलिंग मध्ये एका दिवसात तब्ब्ल 250 किमी अंतर पार केले असून देहू-पंढरपूर ते पंढरपूर-आळंदी अशी परतीची वारी अनुभवत टाळ मृदूंगाच्या गजरात आगळया वेगळया सायकलवारीचा अनुभव सायकल स्वारांनी घेतला असून जशी वारकऱ्याला पांडुरंगांच्या दर्शनाची ओढ लागलेली असतें तसी सायकल वारी करत असतांना पांडुरंगाच्या दर्शनाची आस आणि सायकलिंगचा वेगळा थरार अनुभवयास मिळाला. या वेळी डॉ.पंकज पाटील मुरबाड,डॉ. नागेश चित्ते कडाव,डॉ.शरद तोडमल कलंब व योगेश रेड्डी यांनी अनुभव घेतला असून त्यांना सुरेश खैरे,विशाल तळपडे,नैना बोराडे यांचे सायकल वारीत मोलाचे मार्गदर्शन लाभले.



इन्डो ॲथलेटिक्स सोसायटी अंतर्गत सायकल वारी मध्ये सहभागी झालेल्या प्रत्येक सायकल स्वारांच्या चेहऱ्यावर वेगळाच आनंद होता सायकलिंग सतत केल्याने शरीर फिट राहत असून व्यायाम घडून येतो.अशा सायकलिंग स्पर्धा किंवा सायकल म्यॅरोथॅान विविध भागा मध्ये झाल्यास नक्कीच याचा फायदा नागरिकांना होऊण प्रदूषण मुक्त तसेच चांगला व्यायाम होतो.सायकल वारी हे निमित्त जरी असले सकाळी किंवा संध्याकाळी वेळ काढून जेवढं शक्य होईल तेवढी सायकल चालवली तर चांगल्या व्यायाम बरोबर आपले आरोग्य चांगले राहते.डॉ. हे माझे कर्तव्य तर आहेच पण रोजच्या धकाधकीच्या जीवनात आपल्याला स्वतःला ही वेळ देता आले पाहिजे.सायकल वारी वेळी सपोट व्हेकल,रुग्णवाहीका,ठीक ठिकाणी खाण्याचे,पाणी पिण्याची सोय,हाड्रेशन पॉईंट बनवले होते.अतिशय उत्तम रित्या नियोजन इन्डो ॲथलेटिक्स सोसायटीच्या वतीने करण्यात आले असल्याचे डॉ.पंकज पाटील यांनी दै.ठाणे जीवनदीप वार्ताच्या प्रतिनिधींशी बोलतांना सांगितले.

## भोपर गावात विद्यार्थ्यांना मोफत वह्या वाटप...

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली** : भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेश कार्यकारी अध्यक्ष श्री रविंद्र चव्हाण यांच्या सौजन्याने प्रभाग क्रमांक 114 भोपर येथे सर्व विद्यार्थ्यांना मोफत वह्या वाटप करण्यात आले.

वीस हजार वह्याचे वाटप तीन हजार पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना करण्यात आले. मोफत वह्या मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरती आनंद दिसत होता.

भोपर गावातील माजी नगरसेविका सौ. रवीना अमर माळी, समाजसेवक संदीप माळी परिवहन माजी सदस्य प्रसाद माळी सामाजिक कार्यकर्ते अमोल माळी वैजनाथ देसले शिवराम पाटील कुंदन माळी भाजपचे सर्व कार्यकर्ते आणि पदाधिकारी उपस्थित होते बरोबर जितेंद्र देसले घोषणा पाटील जितेंद्र जोशी असे अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

भोपर गावात आमदार रवींद्र चव्हाण यांच्या निधीतून अनेक विकास कामे पूर्ण होत आहेत आणि विकासाचा ओघ चालूच आहे. हे सर्व कर्तव्य दक्ष नगरसेविका आणि गावातील समाजसेवक यांच्या प्रयत्नाने आणि आमदार साहेबांच्या निधीने विकास काम होत आहेत.

## आदर्श शेतकरी बबन हरणे यांच्या वाढदिवसानिमित्त हेल्मेट वाटप



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापुर** : शहापुरातील उद्यान पंडित पुरस्कार विजेते, आदर्श शेतकरी समाजसेवक बबन हरणे यांच्या वाढदिवसानिमित्त कळगाव-चिंचवली-ठिले ग्रामपंचायतचे उपसरपंच ॲड.जयेश घरत यांनी शहापुरात 100 टू व्हीलर चालकांना बबन हरणे यांच्याहस्ते हेल्मेट वाटप करून हेल्मेट वापरल्याने होत असलेले फायदे समजावून सांगून हेल्मेटमुळे जीव वाचणार असल्याने ह्या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.रस्ते अपघातात डोक्याला हेल्मेट अभावी मृत्यू होण्याच्या अनेक घटना होत असतात त्यामुळे एखाद्या परिवाराचा मोठा आधार निघून जातो." अरे हेल्मेट असता तर तो वाचला असता...?" अशा समाजात प्रतिक्रिया ऐकत असतो.त्यामुळे ही संकल्पना राबविण्यात आली असून आमच्या प्रयत्नाने एखाद्याचा जीव वाचला तरी आमच्या प्रयत्नांना यश येईल असे उपसरपंच जयेश घरत यांनी यावेळी सांगितले. यावेळी समाजसेवक सुनील घरत ,अमित घरत, जगदीश घरत,निलेश घरत ,अविनाश घरत,निलेश विशे आणि ब्रदर्स ग्रुप कळगावचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

## ठाणे महापालिकेच्या अतिक्रमण विरोधी विशेष पथकांची अनधिकृत बांधकामांवर कारवाई

- एमआरटीपी अंतर्गत एक गुन्हा दाखल
- इमारत, कॉलम, वाढीव बांधकाम याप्रकारच्या बांधकामांवर झाली कारवाई
- नऊ प्रभाग समिती क्षेत्रात उपायुक्त दर्जाच्या अधिकाऱ्याच्या नेतृत्वात कारवाईसाठी स्वतंत्र पथकाची नियुक्ती

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : ठाणे महापालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामांचे सर्वेक्षण, पाडकाम या कारवाईसाठी उपायुक्त दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या नेतृत्वात विशेष कारवाई पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे. या पथकांनी केलेल्या कारवाईत एकूण ३० अनधिकृत बांधकामांवर धडक कारवाई करण्यात आली. तसेच, लोकमान्य नगर-सावरकर नगर प्रभाग समिती क्षेत्रात अनधिकृत बांधकामप्रकरणी एमआरटीपीअंतर्गत गुन्हाही दाखल करण्यात आला.

मा. उच्च न्यायालयाने दिलेले निर्देशानुसार महापालिकेच्या नऊ प्रभाग समिती क्षेत्रांमधील अनधिकृत बांधकामांचे सर्वेक्षण करण्यात येत आहे. त्याचबरोबर, प्रभाग समितीच्या बीट निरिक्षकांनी केलेल्या नोंदीनुसार अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यात येत आहे. महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या आदेशाने स्थापन झालेल्या विशेष पथकात प्रभाग समितीनिहाय पथक प्रमुख म्हणून उपायुक्त तसेच सह पथक प्रमुख म्हणून उपनगर आणि कार्यकारी अभियंता यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्यासोबत, सहाय्यक पथक प्रमुख, अभियांत्रिकी अधिकारी, कर्मचारी आदींचा समावेश आहे.



या पथकांना अनधिकृत बांधकामांचा शोध घेऊन त्यांच्या निष्कासनाची कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले. अव्याप्त इमारती, बांधकाम सुरू असलेल्या इमारती पूर्णपणे तोडण्यात येत आहेत. तसेच, काही ठिकाणी वाढीव बांधकाम, कॉलम उभारणी,

**कारवाईच्या आकडेवारीचा तक्ता**

| | |
|---|---|
| नौपाडा-कोपरी | ०३ |
| मुंब्रा | ०३ |
| कळवा | ०१ |
| उथळसर | ०२ |
| माजिवडा-मानपाडा | ०७ |
| वर्तक नगर | ०२ |
| लोकमान्य नगर | ०२ |
| वागळे इस्टेट | ०२ |
| एकूण | ३० |

अनधिकृत बांधकामांच्या निष्कासनाची प्रभाग समितीनिहाय कारवाई सुरूच राहणार असल्याची माहिती उपायुक्त (अतिक्रमण विभाग) शंकर पाटोळे यांनी दिली.

येऊर, मुंब्रा, दिवा, वागळे इस्टेट, नौपाडा, उथळसर, माजिवडा-मानपाडा येथे ही कारवाई करण्यात आली. दिवा येथील १७ इमारतींपैकी आणखी दोन इमारती पाडण्यात आल्या. तेथे एकूण पाडण्यात आलेल्या इमारतींची संख्या १३ झाली आहे. तेथे पाडकामास विरोध झाला. अखेर पोलिस बंदोबस्तात दुपारपासून पाडकामाची कारवाई सुरू करण्यात आल्याचे पाटोळे यांनी सांगितले. दिवा येथील कारवाईच्यावेळी उपायुक्त मनीष जोशी, सचिन सांगळे यांच्यासह पोलीस उपायुक्त सुभाषचंद्र बोरसे आदी उपस्थित होते.

यापूर्वी, या मोहिमेत ३३ बांधकामांवर कारवाई करण्यात आली आहे. त्यात आणखी ३० बांधकामांची भर पडली आहे. या कारवाईसाठी पोकलेन, जेसीबी, गॅस कटर, ट्रॅक्टर ब्रेकर, मनुष्यबळ यांचा वापर करण्यात आला. पोलीस आणि महाराष्ट्र सुरक्षा बलाचे जवान यांच्या बंदोबस्तात ही कारवाई करण्यात आली.

## कल्याणमध्ये अंमली पदार्थ विक्री करणाऱ्या परराज्यीय आरोपींना अटक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण व डोंबिवली शहर परिसरात बेकायदेशीर अंमली पदार्थ विकी करणारे पेडलर यांच्यावर व लेडीज बार कारवाई करण्याकरीता, पोलीस उप आयुक्त यांच्या विशेष कारवाई पथकाने व पोलीस ठाणे यांनी अंमली पदार्थ विरोधी कारवाई केली आहे. या कारवाईत 'कोडेन फॉस्फेट सिरप' अंमली पदार्थ विक्री करीता बाळगणाऱ्या परराज्यीय आरोपींना अटक करण्यात आली आहे.

रविवारी बाजारपेठ पोलीस ठाणे हददीत ००:४५ वा.च्या सुमारास फोर्टीज हॉस्पीटल कडुन बकरी मंडईकडे जाणाऱ्या रस्त्यावर आरोपी तौसिफ आसिफ सुर्वे, वय ३४ वर्षे, रा. कल्याण, लिंगराज अपाराय आलगुड, वय ४० वर्षे, रा. ठि. उदयनगर, कलबुर्गी कर्नाटक राज्य., इरफान उर्फ मोहसीन इब्राहीम सय्यद, वय



३४ वर्षे, रा. ठि. गुलबर्गा, कर्नाटक हे संशयास्पदरित्या कोणाचीतरी वाट पाहत असतांना दिसून आले. या आरोपीतांच्या हालचाली व हावभाव संशयास्पद वाटल्याने त्यांची अंगझडती घेतली असता त्यांच्या अंगझडतीमध्ये 'कोडेन फॉस्फेट सिरप' या नावाचे लेबल असलेल्या १०० मि.लिच्या सिलबंद एकुण १२० बॉटल्स किंमत २७,०००/- या मिळून आल्या. याप्रकरणी संबधीत आरोपींवर बाजारपेठ पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करून पुढील तपास चालु आहे.

## वालधूनी - उल्हासनगरकडे जाणाऱ्या मार्गे वारंवार अपघात व प्रचंड वाहतूक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कोंडीमुळे नागरिकांचे अतोनात हाल होत असत. त्यातच कल्याण रेल्वे स्टेशन जवळील चालू असलेले मेट्रो ट्रेनच्या विकासकामासाठी होणारी जीवघेण्या अडचणीमुळे नागरिकांच्या जीवीत्वास धोकाही निर्माण झाला होता. अशा अनेक समस्यांचे निवारण करण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते विजय चंद्रकांत बोरे कल्याण पश्चिम विधानसभा उपाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्ष व महाविकास आघाडीच्या माध्यमातून कल्याण शहरातील नागरिक तसेच वाहनधारकांना होणारा नाहक त्रास सहन करावा लागत आहे, हे लक्षात घेऊन



महाविकास आघाडीच्या वतीने सुभाष चौक येथे हाइट बैरिकेटिंग लावण्यासाठी व जडवाहनांना प्रवेश बंदी करुन वाहतूक सुरळीत व्हावी यासाठी महापालिका आयुक्त व कल्याण शहर वाहतूक शाखा यांना गेल्या अनेक वर्षापासून पत्र व्यवहार केला जिथे जिथे अडचणी उद्भवत होते त्या त्या ठिकाणी महाविकास आघाडी म्हणून आदरणीय आमचे जिल्हाध्यक्ष लोकनेते श्री. वंडारशेठ पाटील आणि मा. कल्याण शहर प्रमुख शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे सचिनजी बासरे साहेब, विधानसभा सहसंघटक रुपेश भोईर या सर्वांनी आघाडीचा धर्म पाळत सहकार्य केले. म्हणून आज नागरिकांची अडचण सोडविण्यांस मदत झाली आणि ते काम आता पूर्ण झाले असून नागरिकांना वाहतूक कोंडीतून मोकळा श्वास घेता येईल, ह्या कामाबद्दल शहरातील नागरिक महाविकास आघाडी व त्यांचे कार्यकर्ते ह्यांना मनस्वी धन्यवाद देत आहेत.




'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024